ePaper
“...तेव्हापासून मी संसदेत जायला घाबरतो”; शरद पवार

वर्ष - 6 । अंक - 264 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार | दि. 7 जानेवारी 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- ‘द्रोह असेल तर गुन्हा दाखल करा’
- जनजागर यात्रा ‘फसली’!
- समीर वानखेडेंना धक्का




# जलपर्णीचा भस्मासूर!

» ‘स्वच्छ शहर’ संकल्पनेचा केवळ दिखावा : महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

### नदीसुधार प्रकल्पाला चालना द्या...

» नदीसुधार प्रकल्प राबविण्यासाठी काही दिवसांपूर्वी राज्य शासनाकडून ९८५ कोटी रुपयांचा ‘डीपीआर’ मंजूर केल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला होता. मात्र, याबाबत कसलीही कार्यवाही अद्याप दिसत नाही. पालिका प्रशासनाकडून वेळोवेळी गप्पा मारल्या जात आहेत. त्यावर ठोस अंमलबजावणी होत नसताना नदीपात्रातील जलपर्णी काढण्याकडे प्रशासनाकडून होत असलेले दुर्लक्ष नागरिकांच्या संतापात भर टाकणारे ठरत आहे. त्यातच प्रदुषण नियंत्रण महामंडळाने महापालिका परिसरातील सांडपाणी, मैलामिश्रित रासायनिक पाणी थेट नदीपात्रात सोडू देऊ नये, तसेच नदीमधील जलपर्णी काढण्याचे काम महापालिका प्रशासनाने तात्काळ हाती घ्यावे, अशी मागणी होत आहे.

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीला जलपर्णीने विळखा घालण्यास सुरुवात केली असून यामुळे या तीनही नद्या प्रदूषित झाल्या आहेत. या प्रदुषणामुळे नद्यांच्या जवळ राहणाऱ्या नागरिकांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. याकडे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. त्यामुळे पर्यावरण प्रेमींमध्ये नाराजीचा सूर आहे.**

महाईन्यूज ऑन दी स्पॉट

पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या वाहतात. या नद्यांमध्ये महापालिकेकडून हजारो लीटर पाणी कोणतीही प्रक्रिया न करता नद्यांमध्ये थेट सोडण्यात येत असल्याने नद्या प्रदूषित होत आहेत. त्यातच नद्यांजवळ असलेल्या कंपन्यांमधून तसेच शहरातील औद्योगिक भागात कार्यरत असलेल्या शेकडो कंपन्या त्यांच्या सांडपाण्यावर कोणतीच प्रक्रिया करत नसल्यामुळे रसायनमिश्रित पाणी नद्यांमध्ये मिळत आहे. मैलामिश्रित आणि रसायनमिश्रित पाण्यामुळे शहरातून वाहणाऱ्या तीनही नद्यांची प्रदूषण पातळी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

नागरी आरोग्य धोक्यात...

शहरातील या तीनही नद्यांची अवस्था अक्षरश: गटारगंगेसारखी झाली आहे. याला पिंपरी-चिंचवड महापालिकेचा आरोग्य विभाग आणि शहरातील कंपन्या तसेच प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारीच जबाबदार असल्याचा आरोप पर्यावरण प्रेमींमधून होत आहे. नदीपात्रात जलपर्णी साचल्यामुळे पाणी प्रदूषित झाले असून दुर्गंधीमुळे नदीमधील जलचर व काठावरील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे.

# ‘...तर गुन्हा दाखल करा’!

## अजित पवार यांचे आव्हान

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छत्रपती संभाजी महाराजांबाबतच्या भूमिकेवर ठाम आहे. मी केलेले विधान कोणाला द्रोह वाटत असेल तर गुन्हा दाखल करावा, असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी येथे शुक्रवारी दिले. माझी प्रत्येक भूमिका सर्वांना पटेल असे नाही. माझी भूमिका चुकीची ठरणारे हे कोण ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.छत्रपती संभाजी महाराज धर्मवीर नव्हते. त्यांना स्वराज्य रक्षक म्हणणे योग्य आहे, असे विधान अजित पवार यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात केले होते.**

त्याविरोधात भारतीय जनता पक्षाने आक्रमक भूमिका घेत राज्यभर आंदोलने केली होती. संभाजी महाराजांना धर्मवीर न म्हणणे, हा द्रोह आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते. या पार्श्वभूमीवर भूमिकेशी ठाम असल्याचा पुनरूच्चार करतानाच द्रोह असेल तर गुन्हा दाखल करा, असे आव्हान अजित पवार यांनी सत्ताधाऱ्यांना दिले. ते पुण्यात पत्रकारांशी बोलत होते.

मी माझ्या भूमिकेशी ठाम असतो. भारतीय नागरिक म्हणून प्रत्येकाला भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. विचार स्वातंत्र्य आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. मी जी भूमिका मांडली ते सर्वांच पटेल, असे नाही. मात्र, माझी भूमिका चुकीची आहे, हे ठरविणारे तुम्ही कोण, असे अजित पवार यांनी सांगितले. मी माफी मागावी, अशी मागणी होत आहे. मात्र मी कोणता गुन्हा केला आहे. अपशब्दही वापरलेला



नाही. राज्यपाल, मंत्री आणि सत्ताधारी आमदारांनी बेताल वक्तव्य केले. अपशब्द वापरले. जे शब्द वापरायला नको होते ते शब्द सत्ताधाऱ्यांनी वापरले. जीवात जीव असेपर्यंत छत्रपतींच्या विचारांशी आम्ही द्रोह करणार नाही. आमच्याकडून तसे घडणार नाही, असेही अजित पवार यांनी सांगितले.

पहिल्यापासून आम्ही पुरोगामी विचार माणणारेच आहेत. महापुरुष आणि वडीलधाऱ्यांनी जी शिस्त घालून दिली.

## शॉर्ट न्यूज

### साखर उत्पादनात ५० लाख टनांचा टप्पा पार

**पुणे ।** राज्यातील साखर उद्योगाने बुधवापर्यंत ५० लाख टन साखर उत्पादनाचा टप्पा पार केला आहे. १९७ कारखान्यांनी गाळप सुरू करून मागील हंगामापेक्षा सरस कामगिरी करून गाळप आणि साखर उत्पादनातही आघाडी घेतली आहे.

साखर आयुक्तालयाने दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी ४ जानेवारीअखेर शंभर सहकारी आणि ९७ खासगी, अशा १९७ साखर कारखान्यांनी ५३६.७८ लाख टन उसाचे गाळप करून पन्नास लाख टन (५०५.६४ लाख क्विंटल) साखरेचे उत्पादन केले आहे.सियाचिन ग्लेशियरवर असलेल्या या प्रत्यक्ष पोस्टवर लष्करी महिला अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची ही पहिलीच वेळ आहे. आजवर महिला अधिकाऱ्यांना त्यांच्या नियमित सेवाकार्याचा भाग म्हणून सियाचिन बेस कॅम्पवर तैनात करण्यात येत होते. जे सुमारे नऊ हजार फुटांवर आहे.यंदा दसरा, दिवाळी आणि परतीच्या पावसामुळे गळीत हंगाम सुरू होण्यास उशीर झाला होता. सुरुवातीच्या महिनाभरात हंगाम संथ गतीने सुरू होता.

## शहराच्या विकासासाठी राजकारण न करता काम करा, अजित पवार

**» राज्यातील शिंदे आणि फडणवीस सरकार हे महापुरुषांबाबत तेढ निर्माण करत आहे. त्यामुळे राज्याच्या आणि शहराच्या विकासासाठी राजकारण न करता दूरदृष्टी ठेवून काम केले पाहिजे. राज्यात आमची सत्ता असताना पुण्यात आयटी हब तयार करून लाखो तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला. मात्र, आपले प्रकल्प परराज्यांत जात आहे. हे राज्याचे दुर्दैव आहे, अशी टीका विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली.**

**» माजी सभागृह नेते सुभाष जगताप यांच्या सहकारनगर येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालय आणि नागरी सुविधा केंद्राचे उद्घाटन विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शहराध्यक्ष प्रशांत जगताप, सुभाष जगताप, उषा जगताप, संतोष नागरे, सुशांत ढमढेरे, गौरव घुले, दिलीप अरूंदेकर, श्वेता होनराव, नीलेश वाघमारे, श्रीनिवास जगताप आदी उपस्थित होते. नागरी सेवा महत्वाचे केंद्र असून नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी हक्काचे ठिकाण झाले पाहिजे, असे सांगून अजित पवार म्हणाले, शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली होती तेथे गुण्या गोविंदाने राहण्याची संस्कृती होती. मात्र, राज्यातील सध्याचे सरकार भेदभाव करून तेढ निर्माण करत आहे.यावेळी सुभाष जगताप म्हणाले, सहकारनगर भागाचा विकास केला खड्डे विहिरीत रस्ते, तळजाऊ टेकडीवर दहा हजार देशी झाडे लावली आहेत. शहरात राष्ट्रवादीची सत्ता असताना अनेक विधायक कामे केली आहेत.**

# शरद पवार यांच्याकडून जगताप कुटुंबियांचे सांत्वन!

## » पिंपळे गुरव येथील निवासस्थानी भेट : आमदार जगताप यांच्या आठवणींना उजाळा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे ३ जानेवारी रोजी निधन झाले. शुक्रवारी (दि. ६) राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व खासदार शरद पवार यांनी पिंपळेगुरव येथील निवासस्थानी येऊन जगताप कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी खासदार श्रीनिवास पाटील त्यांच्यासोबत होते. शरद पवार यांनी लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली



वाहिली. त्यानंतर त्यांनी जगताप कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच जगताप यांच्या कुटुंबातील सर्वच सदस्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. या दुःखातून सावरण्यासाठी जगताप कुटुंबाला धीर दिला.

यावेळी दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप, मुलगी ऐश्वर्या रेणुसे-जगताप, बंधू व भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, विजय जगताप, लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या बहिणी व इतर सर्व नातेवाईक उपस्थित होते.

# जागतिक मराठी संमेलनाचे शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन

।पुणे महाईन्यूज । प्रतिनिधी।

जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘शोध मराठी मनाचा’ या १८ व्या जागतिक मराठी संमेलनाचे शुक्रवारी (६ जानेवारी) ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते सायंकाळी साडेचार वाजता उद्घाटन पार पडले.

ज्येष्ठ लेखक डॉ. ज्ञानेश्वर मुळे या संमेलनाचे अध्यक्ष असून विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील स्वागताध्यक्ष आहेत. या १८ व्या जागतिक मराठी संमेलनात अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दुबई, दक्षिण कोरिया, नेदरलँड, मॉरिशस, न्यूझीलंड या देशांमधील मराठी मान्यवर सहभागी झाले आहेत. संत तुकाराम नगर येथील डॉ.





डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या सभागृहामध्ये होणाऱ्या संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमास माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

ज्येष्ठ उद्योजक आणि प्राज इंडस्ट्रीजचे संस्थापक डॉ.प्रमोद चौधरी यांना ‘जागतिक मराठी भूषण पुरस्कार’ आणि ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांना विवा चॅरिटेबल ट्रस्ट, वसईच्या वतीने ‘जागतिक मराठी गौरव’ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. आमदार जयंत पाटील, हितेंद्र ठाकूर, दिग्दर्शक नागराज मंजुळे, अभिनेते सयाजी शिंदे, उद्योगपती अरुण फिरोदिया आणि बीव्हीजी ग्रुपचे हणमंतराव गायकवाड या वेळी उपस्थित होते.

### पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठी अनुपस्थिती

# जनजागर यात्रा 'फसली'!

## » शहर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचे संघटनात्मक अपयश

पिंपरी । महाईन्यूज ।

**देशात वाढती बेरोजगारी आणि महागाईविरोधात राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या पुढाकाराने राज्यात केंद्र सरकार आणि भारतीय जनता पार्टीविरोधात रान पेटवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या यात्रेचे बुधवारी पिंपरी-चिंचवड शहरात आगमन झाले.मात्र, या 'जनजागर यात्रे'कडे महिला आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह पाठ फिरवली. महिला राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांच्या पुढाकाराने प्रदेशस्तरावर नियोजित केलेली 'जनजागर यात्रा' पिंपरी-चिंचवड शहरात काल दाखल झाली. 'सावित्रींच्या लेकींचा जनजागर' असा संदेश देण्याचा यामाध्यमातून प्रयत्न करण्यात आला. मात्र, या यात्रेचे नियोजन पूर्णपणे फसलेले पहायला मिळाले.**



या यात्रेत शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, प्रदेश युवक आघाडीचे कार्याध्यक्ष रविकांत वरपे यांच्यासह पुरूष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा भरणा होता. वास्तविक, महिला कार्यकर्त्यांच्या संघटनात्मक हेतूने ही यात्रा आयोजित केली असून, प्रदेशाध्यक्षा विद्या चव्हाण मार्गदर्शन केले. पिंपरीत यात्रेचे आगमन झाले आणि भोसरीतील पीएमटी चौकात यात्रेचा समारोप करण्यात आला.

वास्तविक, राज्यातील राजकीय पक्षांच्या संघटनात्मक घडामोडींचे निरीक्षण केले असता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या माध्यमातून प्रबोधन यात्रा सुरू आहे. भारतीय जनता पार्टीच्या पुढाकाराने महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांचा दौरा सुरू आहे. याच धर्तीवर राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या माध्यमातून 'जनजागर यात्रा' प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.

काही दिवसांपूर्वी, भाजपाच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. शहर महिला मोर्चाचा मेळावा झाला. त्यावेळी संघटनात्मक बांधणी, मेळावा आणि त्यानंतर पत्रकार परिषद असे यशस्वी नियोजन करुन भाजपा महिला शक्ती सक्षम असल्याचा संदेश

### राष्ट्रवादीतील निष्ठावंत कार्यकर्त्यांमधून खंत व्यक्त

**»पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व सेलचे प्रमुख पदाधिकारी आणि स्वत: शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी प्रयत्न करुनसुद्धा 'जनजागर यात्रा' प्रभावीपणे आयोजित करता आली नाही. यात्रेसंदर्भात प्रसारमाध्यमांशी समन्वय करणे अपेक्षीत होते. यात्रेमागचा हेतू आणि नियोजन पिंपरी-चिंचवडकरांपर्यंत पोहोचणे अपेक्षीत होते. मात्र, तसे न करता केवळ नियोजनाचे सोपस्कार पार पाडण्यात आले. शहर राष्ट्रवादी महिला आघाडीकडे सुमारे ४५० पदाधिकाऱ्यांची कार्यकारिणी असल्याचे शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांनी अनेकदा सभा-संमेलनामध्ये स्पष्ट केले आहे. त्यामुळे किमान ३०० महिला या जनजागर यात्रेत सहभागी होणे अपेक्षीत होते, अशी खंत राष्ट्रवादीतील निष्ठावंत कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे.**

### अजित पवार यांच्या सूचनेकडे दुर्लक्ष...

**» गेल्या महिन्यात राष्ट्रवादीतील राज्यस्तरीय दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत 'विचार प्रबोधन' कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील यांच्यासह राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार स्वत: उपस्थित होते. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसाठी आयोजित केलेल्या प्रबोधन शिबिराला महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची संख्या अगदी नगण्य होती. याकडे लक्ष वेधत अजित पवार यांनी महिला शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांच्यासह शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांना सूचना केल्या होत्या. महिला कार्यकर्ते, कार्यकारिणीतील सदस्यांची संख्या कार्यक्रमात दिसली पाहिजे, असे सूचवले होते. मात्र, या सूचनेकडे शहर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे काय? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.**

---

# 'स्पाईन रोड'ची प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावा!

## » आमदार महेश लांडगेः महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना पत्र

पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

स्पाईन रोडचे प्रलंबित काम मार्गी लावून त्रिवेणीनगर आणि परिसरातील वाहतूक सुरळीत करावी. त्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना आमदार महेश लांडगे यांनी महापालिका प्रशासनाला दिल्या आहेत. याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, तळवडे येथून आयटी आणि औद्योगिक पट्ट्यातून येणारी वाहतूक त्रिवेणीनगर भागातून स्पाईन रोड जातो. या रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक



कोंडी होते. त्यामुळे रस्ता बाधितांचा प्रश्न मार्गी लागल्यास वाहतूक समस्या सुटणार आहे. त्यासाठी त्रिवेणीनगर चौकात जाणाऱ्या स्पाईनरोडमध्ये बाधित होणाऱ्या रहिवाशांचा रखडलेला पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे.वास्तविक, या बाबत राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली होती. मात्र, त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. या रस्त्यामध्ये एकूण १३२ रहिवाशी बाधित झाले आहेत. त्यापैकी ३९ बाधितांना भूखंड वाटप करण्यात आले आहे. उर्वरित बाधितांचा प्रश्न अद्याप 'जैसे थे' आहे.

स्पाईन रोड बाधितांच्या पुर्नवसनासाठी वाढीव भूखंड देण्याची मागणी सरकारकडे केली होती. या मागणीला राज्य सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. मात्र, प्रशासकीय पातळीवर अद्याप कार्यवाही झालेली नाही. रस्ता बाधित नागरिकांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यासाठी प्राधिकरणाला महापालिका प्रशासनाने सुमारे २३ कोटी रुपये अदा केले होते. महापालिका प्रशासनाने आतापर्यंत ३९ बाधितांचे पर्यायी जागेचे करार केले आहेत. उर्वरित करार अद्याप बाकी आहेत, असेही आमदार लांडगे यांनी निवेदनात म्हटले आहे.*

### बाधितांचा मोबदला देण्याची कार्यवाही करा...

**» स्पाईन रोड बाधितांचा विषय प्रलंबित असल्यामुळे सुमारे भूसंपादन प्रक्रिया गतीमान करावी. त्यासाठी विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. भूसंपादनासाठी निधी मंजूर झाला आहे. मात्र, अद्याप पुढील कार्यवाही झालेली नाही. कागदपत्रे अपुरी असल्याचे कारण सांगून तांत्रिकदृष्या अडचणी सांगितल्या जात आहेत. ज्या बाधित नागरिकांनी जागा स्पाईन रस्त्यासाठी भूसंपादन केली आहे. त्यांना मोबदला देण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे.याबाबत प्रशासकीय पातळीवर तात्काळ कार्यवाही करावी, अशी सूचनाही आमदार लांडगे यांनी केली आहे.**

## संपादकीय »

# संप मिटले; आव्हाने कायम

*ऊर्जा खातेही सांभाळणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा संप मिटविण्यात यश मिळवले असले तरी ऊर्जा क्षेत्राचे दरवाजे ठोठवणाऱ्या खासगी कंपन्या आपले प्रयत्न सोडणार नाहीत. वीज वितरणाचा समांतर परवाना मिळावा, अशी खासगी कंपन्यांची इच्छा असणे स्वाभाविक आहे.*

महाराष्ट्रात अचानक दोन संप सुरू झाले. पहिला 'मार्ड' या निवासी डॉक्टरांच्या संघटनेचा आणि दुसरा राज्यातील वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा. सुदैवाने, दोन्ही संप परिस्थिती चिघळून हाताबाहेर जाण्याच्या आत संपले आहेत. हे संप सुरू झाले तेव्हा स्वाभाविकच एसटी संपाची आठवण अनेकांना झाली असेल. त्या संपाने महाराष्ट्रातील सामान्य प्रवाशांची अक्षरश: कोंडी केली. तसेच आत्ताही झाले असते. महाराष्ट्र असोसिएनशन ऑफ रेसिडेन्ट डॉक्टर्स म्हणजे 'मार्ड'च्या संपाच्या पहिल्याच दिवशी कितीतरी शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. शहरांमधील सरकारी रुग्णालयांमधील सार्वजनिक आरोग्य सेवांचा तरुण, शिकाऊ डॉक्टर हा कणा आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही. मात्र, 'मार्ड'ने संप पुकारला नाही किंवा निषेधाचे काही पाऊल टाकले नाही, असे वर्ष क्वचितच जात असेल. असे वारंवार होणे, यात एका बाजूला सरकारची या तरुणांकडे पाहण्याची असंवेदनशील वृत्ती दिसते; तसेच, दुसरीकडे, आपण काम चालू ठेवूनही सरकारकडून हव्या त्या गोष्टी करून घ्यायला हव्यात, यासाठी विद्यार्थी डॉक्टरांनी आता आंदोलनाचा आणखी कल्पक विचार करायला हवा. या डॉक्टरांची वसतिगृहे स्वच्छ, नेटकी करणे हे सरकारला सहज शक्य आहे. तसेच, त्यांना करोना काळातील अतिरिक्त सेवेचा मोबदलाही पूर्णपणे मिळायला हवा. वसतिगृहांच्या नूतनीकरणासाठी सरकारने आता केंद्र सरकारकडे पाहू नये. हजारो कोटींचा समृद्धी महामार्ग बांधण्यासाठी जर पैसा उभा करता येतो; तर या मुलांसाठी पाचशे-हजार कोटी रुपये सरकार अनेक मार्गांनी उभे करू शकते. अगदी मोठ्या देवस्थानांकडेही यासाठी शब्दही टाकू शकते. २४ तास 'ऑन कॉल' राहणाऱ्या डॉक्टरांना असे रस्त्यावर यायला लागणे, राज्याला भूषणावह नाही. वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या संपाचा विषय मात्र इतका सोपा व सरळ नाही. ऊर्जा खातेही सांभाळणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा संप मिटविण्यात यश मिळवले असले तरी ऊर्जा क्षेत्राचे दरवाजे ठोठवणाऱ्या खासगी कंपन्या आपले प्रयत्न सोडणार नाहीत. वीज वितरणाचा समांतर परवाना मिळावा.

# बेरोजगारीचा वाढता आलेख






बेरोजगारीच्या दरात पुन्हा वाढ होत आहे. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये बेरोजगारीच्या दरात ०.३ टक्क्यांनी वाढ झाली. आकडा खूपच कमी वाटत असला, तरी १३५ कोटी लोकसंख्येच्या देशात तो बराच जास्त आहे. तरुणांचे तांडे रोजगाराच्या शोधत देश पालथा घालत आहेत. तरीही रोजगार मिळेल याची शाश्वती नाही. अस्वस्थ तरुणांच्या हाताला काम हवे आहे आणि ते देण्यास सरकार कमी पडत आहे. गेल्या काही काळात सातत्याने बेरोजगारीच्या दरात वाढ होत असताना दिसत आहे. दर वर्षी त्यात संख्यात्मक वाढच होत आहे.

### रोजगार म्हणजे काय?

'रोजगार म्हणजे काय' हेही स्पष्ट नाही. अनेकांना रोजगार म्हणजे सरकारी नोकरी असेच वाटते. रोजगार म्हणजे केवळ सरकारी नोकरी नाही. रोजगार म्हणजे प्रत्येक हाताला कोणते ना कोण काम मिळेल आणि त्याचा उदरनिर्वाह चालेल असे वातावरण निर्माण करणे होय. हे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी सरकारचीच असते. कौशल्याला पूरक असा रोजगार निर्माण झाला पाहिजे. पुस्तकी शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या लाखो तरुणांना सरकारने विश्वासात घेऊन, त्यांच्या आशा-अपेक्षा, कौशल्य, कलेला पूरक असे वातावरण निर्माण करायला हवे.

### बेरोजगारी कुठे?

बेरोजगारीचा दर वाढत असताना तो कुठल्या भागात वाढतो आहे हेही पाहू. डिसेंबर महिन्यांतील आकडेवारीवरून बेरोजगारीचा सर्वाधिक दर हरयाणात दिसतो. तेथे ३७.४ टक्के दर आहे. ही स्थिती भयावह आहे; कारण हा भाग शेतीसाठी समृद्ध मानला जातो. मात्र, त्याच राज्यात बेरोजगारी वाढते आहे. तीच स्थिती बिहारची. बिहारमध्ये बेरोजगारीचा दर १९.१ टक्के आहे. बिहारही शेतीसाठीच प्रसिद्ध आहे. तरीही तिथे बेरोजगारांचे तांडे दिसत आहेत. महाराष्ट्रात मात्र हा दर ३.१ टक्के इतका कमी असल्याचे दिसते. राजस्थान, दिल्लीतही बेरोजगारीचे आकडे अधिक आहेत. शहरी भागात रोजगार कमी झाल्याचे दिसत आहे आणि ग्रामीण भागात किंचित वाढलेला दिसत आहे.

### काय आहेत कारणे?

रोजगारकेंद्री धोरणाचा अभाव हे याचे प्रमुख कारण आहे. कोणत्याही सरकारच्या धोरणात रोजगार हाच केंद्रस्थानी असायला हवा. मात्र, तसे न होता आकर्षक घोषणा आणि लोकप्रिय योजना यातून बाहेर पडण्याची कोणतीही मानसिकता सरकारची दिसत नाही. वर्षानुवर्षे हीच स्थिती आहे. आकडे तेच, फक्त संख्येत बदल इतकाच काय तो फरक. रोजगारनिर्मिती करण्यात कमी पडणारे धोरण आणि सरकारचे निर्णय याचा हा परिणाम आहे. रोजगाराभिमुख योजना कमी पडत आहेत. कृषी, सेवा, उद्योग आणि पायाभूत सोयी या दोनच क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार तयार होतो. मात्र, गेल्या काही काळात या सर्वच क्षेत्रांत नकारात्मक स्थिती दिसत आहे. कृषी क्षेत्रातही तीच स्थिती आहे. उत्पादन वाढत असले, तरी रोजगारात वाढ होताना दिसत नाही. उद्योगांचा विस्तार नाही आणि आहे तिथे कायम रोजगार नाही. त्यातच करोनामुळे रोजगाराची संधीच खुंटल्याचे दिसत आहे. ही स्थिती केवळ भारतातच नव्हे, तर जगभर आहे. २०१९पर्यंत साधारणत: साडेपाच-पावणेसहा टक्क्यांच्या आसपास असलेला बेरोजगारीचा दर त्यानंतर आठ टक्क्यांपर्यंत गेलेला दिसतो.

### उपाय काय?

सरकारी नोकरीतील रिक्त पदे भरायला हवीत; परंतु तसे करणे म्हणजे रोजगार दिला असे नव्हे. कायमस्वरूपी रोजगार देण्यासाठी पायाभूत क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक वाढायला हवी. रस्ते, वीज, रेल्वे, हवाई वाहतूक, जलवाहतूक आदी विविध क्षेत्रांत रोजगाराची प्रचंड संधी असते. त्यावर सरकारला लक्ष द्यावे लागेल. उद्योग, कृषी क्षेत्रातील रोजगारवाढीसाठी पावले टाकावी लागतील. उद्योगांचा विस्तार होईल, यासाठी निश्चित योजना आणाव्या लागतील. महत्त्वाचे म्हणजे लोकानुनय करणाऱ्या योजनांना चाप लावावा लागेल. तरच आगामी नव्या वर्षात बेरोजगारीचा दर कमी होऊन रोजगाराच्या संधी वाढतील.. शेतीशी काडीमात्र संबंध नसणाऱ्या शहरवासीयांच्या पोटाची खळगी केवळ आणि केवळ शेतकरी बंधूंमुळेच भरत आहेत, याचा सार्थ अभिमान आहे.

# जैवविविधतेचा खजिना

**वाळूच्या किनारपट्टीवर (गिरगाव, दादर, माहीम, जुहू) वेगवेगळ्या प्रकारचे शंख, शिंपले दिसतात. ते वाळूच्या आत राहतात, त्यांचे रंगही वाळूशी मिळतेजुळते असतात. वाळूच्या किनाऱ्यात शिंपल्या, समुद्रफुल, याती खेकडा, चिंबोरी, शिंग खेकडा, तिसरी, खुपरी, कवडी असे जीव आढळतात.**

मुंबईला राष्ट्रीय उद्याने, डोंगररांगा, तलाव आणि समुद्रकिनारे अशा नैसर्गिक गोष्टी लाभल्या आहेत. मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यांमध्ये आगळी सजीवसृष्टी दडली आहे. मुंबईचे किनारे प्रदूषित असल्याने ही सजीवसृष्टी काहीशी दुर्लक्षित आहे. शिवाय, तिचा पुरेसा अभ्यास झालेला नाही. सागरी जैवविविधता बघायची असेल, तर खोल समुद्रात जायची गरज नाही. मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर ही सजीवसृष्टी पाहता येते. ही पाहायची योग्य वेळ म्हणजे, ओहोटीची. ज्या भागात भरतीचे पाणी येते व ओहोटीवेळी जिथपर्यंत पाणी कमी होते, त्या जागेला 'इंटर टायडल झोन', म्हणजेच भरती-ओहोटीमधील अंतर असे म्हणतात. येथे ही सजीवसृष्टी पाहता येते.

समुद्रकिनाऱ्यांचे तीन प्रकार असतात. वालुकामय, खडकाळ आणि चिखलाचे किनारे. मुंबईला तीनही प्रकारचे किनारे लाभले आहेत. तिथे आढळणारे जीवही अधिवासानुसार वेगवेगळे असतात.



वाळूच्या किनारपट्टीवर (गिरगाव, दादर, माहीम, जुहू) वेगवेगळ्या प्रकारचे शंख, शिंपले दिसतात. ते वाळूच्या आत राहतात, त्यांचे रंगही वाळूशी मिळतेजुळते असतात. वाळूच्या किनाऱ्यात शिंपल्या, समुद्रफुल, याती खेकडा, चिंबोरी, शिंग खेकडा, तिसरी, खुपरी, कवडी असे जीव आढळतात. खडकाळ किनाऱ्यात (मरीन लाइन्स, हाजीअली, बांद्रा बॅण्डस्टॅण्ड) वाळूच्या किनाऱ्यापेक्षा जास्त जैवविविधता दिसते. बरेच सजीव हे खडकांना घट्ट धरून असतात.

वेगवेगळ्या प्रकारचे खेकडे, झिंगे, प्रवाळ खडक, अष्टपाद, कालव, समुद्री शेवाळ, समुद्री गोगलगाय अशी सजीवसृष्टी तेथे आढळते. त्यानंतरचा, महत्त्वाचा किनारा म्हणजे चिखलाचा किनारा (शिवडी, भांडुप, वाशी). कांदळवनांचा हा भाग म्हणजे अनेक खेकडे, मासे, झिंगे, शंखशिंपले यांची नर्सरीच आहे. या किनाऱ्यावर चिखलात राहणाऱ्या गोगलगायी, फिडलर खेकडा असे सजीव आढळतात. प्रदूषित किनाऱ्यांवरही ही जीवसृष्टी तग धरून आहे. प्रदूषण व किनारपट्टीवरील विकासकामांमुळे ही सजीवसृष्टी धोक्यात आली आहे. म्हणूनच ती समजून घेणे आणि प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आपण महत्त्वाकांक्षी नक्कीच असावं, पण त्यासाठी चुकीचे निर्णय, चुकीच्या लोकांकडून घेतलेली आर्थिक मदत आपल्या अंगलट येऊ शकते याचेही भान जपणे आवश्यक आहे. त्यामुळे युद्धबंदीसाठी मुत्सद्देगिरीला वाव आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# समीर वानखेडेंना धक्का !

## सीबीआयच्या कारवाईपासून संरक्षण देण्याच्या मागणीला न्यायालयाचा नकार

। मुंबई। महाईन्यूज ।

बेहिशेबी मालमत्ता प्रकरणी सनदी अधिकारी समीर वानखेडे ( SAMEER WANKHEDE ) यांना कोणताही दिलासा देण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिलाय. सीबीआयच्या कारवाईपासून संरक्षण देण्याची वानखेडे यांची मागणी न्यायालयाने नाकारली आहे. सीबीआयकडून कोणतीही नोटीस नसताना केवळ ऐकीव माहितीच्या आधारावर कोणताही दिलासा देता येणार नाही, असे दिल्ली हायकोर्टाने म्हटले आहे.

सीबीआयच्या कारवाईपासून संरक्षण देण्याच्या मागणीला हायकोर्टाने नकार दिल्यानंतर समीर वानखेडे यांनी आपली याचिका मागे घेतली आहे. कारवाईपासून संरक्षण देण्याच्या मागणीला नकार दिला असला तरी भविष्यात नव्यानं सुधारीत याचिका दाखर करण्यास कोर्टाने वानखेले यांना परवानगी दिली आहे.



एनसीबी मुंबईचे विभागीय संचालक असताना समीर वानखेडेंच्या काळात एनसीबीनं बॉलिवूडच्या अमली पदार्थ संबंधांविरोधात मोठी मोहीम चालवली होती. त्यावेळी समीर वानखेडेंवर गंभीर आरोप झाले होते.

चित्रपट अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याच्याशी संबंधित ड्रग्ज प्रकरणाच्या तपासात फसलेले समीर वानखेडेंची बदली करण्यात आली आहे. आयआरएस अधिकारी समीर वानखेडे हे एनसीबी मुंबईचे झोनल डायरेक्टर होते. ते महसूल गुप्तचर संचालनालयात तैनात आहेत.



समिर वानखेडे यांच्या याचिकेवर न्यायमुर्ती अनुप जयराम बम्बानी यांच्यासमोर आज सुनावणी झाली. या कारवाईबाबत वानखेडे यांच्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नव्हता. केवळ ऐकीव माहितीच्या आधारावर ही याचिका करण्यात आल्याचे न्यायालयाच्या निर्दशनास आले. त्यामुळे न्यायालयाने या याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार दिला.

त्यानंतर वानखेडे यांनी ही याचिका मागे घेण्यास परवानगी द्यावी, अशी विनंती न्यायालयाला केली. न्यायालयाने ही याचिका मागे घेण्यास परवानगी दिली. तसेच तपास यंत्रणेने चौकशीसाठी काही पत्रव्यवहार केल्यास त्याआधारावर तुम्ही संबंधित न्यायालयात दाद मागू शकता, असेही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले.

### समिर वानखेडेंनी आपल्या याचिकेत काय म्हटले?

**माझ्यावर बेहिशेबी संपत्तीचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्यामुळे मला अटक होऊ शकते. जप्तीची कारवाई होऊ शकते. माझ्या मालमत्तेची तपासणी होऊ शकते. तशी सूचना अंमली पदार्थ नियंत्रण विभागाने केंद्रीय तपास यंत्रणेला (सीबीआय) केली आहे. या कारवाईपासून मला संरक्षण द्यावे, अशी मागणी वानखेडे यांनी आपल्या याचिकेत केली होती.**

# विधान परिषद निवडणूक: बच्चू कडूंचा शिंदे-फडणवीस सरकारला धक्का

## विश्वासात न घेतल्याने उचललं मोठं पाऊल

। मुंबई । महाईन्यूज ।

३० जानेवारी रोजी विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे-फडणवीस सरकारमधील खदखद पुन्हा एकदा बाहेर आली आहे. अपक्ष आमदार बच्चू कडू यांनी शिंदे-फडणवीस सरकारविरोधात दंड थोपाटले आहेत. बच्चू कडूंनी आगामी पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघात पाचही जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला विश्वासात घेतलं नसल्याने आपण पाचही मतदारसंघात उमेदार उभे केले आहेत, अशी घोषणा बच्चू कडूंनी केली आहे.

त्यामुळे आगामी निवडणुकीत प्रहार जनशक्ती पक्ष विरुद्ध भाजपा व शिंदे गट असा सामना पाहायला मिळणार आहे. याबाबत अधिक माहिती देताना बच्चू कडू म्हणाले,



“अमरावतीच नव्हे तर आगामी ३० जानेवारी रोजी होणाऱ्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकांमध्ये पाचही जागांवर आमचे उमेदवार उभे राहणार आहेत. यासाठी मराठवाड्यातून डॉ. संजय तायडे, अमरावतीतून किरण चौधरी, कोकण विभागातून नरेश शंकर कौंडा, नागपुरातून अतुल रायकर तर नाशिकमधून ॲड. सुभाष झगडे असे पाच उमेदवार निवडणुकीत उभा राहणार आहेत. यातील एक ते दोन जागा आम्ही कुठल्याही परिस्थित जिंकू...” असा विश्वासही बच्चू कडू यांनी व्यक्त केला. बच्चू कडू पुढे म्हणाले की, शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघात आम्ही आमचे उमेदवार उभे करण्याबाबतची सगळी कल्पना मुख्यमंत्री एकनाथ आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली होती. या निवडणुकांसाठी आम्ही गेल्या तीन वर्षांपासून मेहनत करतोय. तीन ठिकाणी आम्ही प्रचंड मतनोंदणी केली आहे. त्यामुळे तुम्ही आम्हाला विचारात घेऊन उमेदवार उभा करावा. शिंदे गट, प्रहार आणि भाजपा अशी युती करून उमेदवार द्यावेत, अशी विनंती मी त्यांना केली होती.

# “महाराष्ट्रात गुंतवणूकदार येत नाहीत कारण राज्याला एक सीएम तर दुसरे....”

## आदित्य ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला

। मुंबई । महाईन्यूज ।

महाराष्ट्रात बेरोजगारी आहे, स्त्रियांचे प्रश्न आहेत, उद्योग येत नाहीत. मात्र आपल्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना हे काहीही ऐकू येत नाही त्यांना फक्त दिल्लीत गेल्यावर आपल्या हिताचं ऐकू येतं असं म्हणत ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर टीका केली आहे. एवढंच नाही तर गुंतवणूकदार महाराष्ट्रात येण्यास उत्सुक नाहीत कारण राज्यात एक सीएम आणि दुसरे स्पेशल सीएम आहेत असंही त्यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास कुणीही उत्सुक नाही कारण राज्यात एक सीएम आणि एक स्पेशल सीएम आहेत. चौकशा लावणं, ईडीकडून त्रास देणं, जाणीवपूर्वक टार्गेट करणं हे सगळे प्रकार सुरू असल्याने कोण गुंतवणूक करणार? हे सरकार लवकरच पडणार आहे. पण पुढचं सरकार येईल ते महाराष्ट्राच्या हिताचं असलं पाहिजे असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. आपल्या राज्याचे मुख्यमंत्री फक्त दिल्लीचं ऐकतात बाकी कुणाचं काहीही ऐकत नाही. एकनाथ शिंदे यांनी २१ जूनला शिवसेनेच्या नेतृत्त्वाविरोधात म्हणजेच उद्धव ठाकरेंच्या विरोधात बंड पुकारलं. त्यानंतर राज्यातलं महाविकास आघाडीचं सरकार २९ जूनला उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्याने कोसळलं. शिवसेनेत एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे उभी फूट पडली आहे.



### अनेक MOU या सरकारने थांबवले आहेत

**महाराष्ट्रात एकही उद्योग गेल्या सहा महिन्यात आलेला नाही. अनेक MOU थांबवून ठेवले आहेत. दाव्होस या ठिकाणी जाण्याची त्यांची तयारी सुरू आहे. हे MOU त्याचसाठी थांबवण्यात आले आहेत. तिकडे जाऊन त्यावर सह्या करायच्या आणि तिथून काहीतरी गुंतवणूक आली आहे हे दाखवायचं. जीडीपी घसरला आहे याबाबत विचारलं असता ते म्हणाले की सहा महिन्यांपूर्वी केव्हाची साल कुणी टाकली तुम्हाला माहित आहेच.महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास कुणीच उत्सक नाही**

# चीनमध्ये कोरोनाचा उद्रेक!

## » एका महिन्यात 40 टक्के लोकांना संसर्ग

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**




चीनमध्ये कोरोनाचा उद्रेक सुरुच आहे. कोरोना संसर्गाच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढताना दिसत आहे. तसेच मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. एशिया टाइम्सने हेल्थ एक्सपर्ट्सच्या अहवालानुसार माहिती दिली आहे की, गेल्या एका महिन्यामध्ये चीनमधील सुमारे 40 टक्के नागरिकांना कोरोनाचा संसर्ग झाला आहे. चिनी महामारी विशेष तज्ज्ञ झेंग गुआंग यांनी सांगितले आहे की, चीनमधील बहुतेक शहरांमध्ये 50 टक्के लोकांना कोविड-19 संसर्ग झाला आहे. त्यामुळे गेल्या महिन्यात चीनमधील सुमारे 40 टक्के लोकसंख्या कोरोना संक्रमित झाली आहे. हा आकडा दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

**भारतात ओमायक्रॉनचे 11 सब व्हेरियंट**

जगातील कोरोनाचा धोका वाढता भारताने खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. प्रत्येक विमानतळावर आतंरराष्ट्रीय प्रवाशांना कोविड निगेटिव्ह अहवाल अनिवार्य असून प्रवाशांचे थर्मल स्क्रिनिंग तसेच रँडम कोविड चाचणी करण्यात येत आहे. त्याशिवाय चीन, थायलंडसह सहा देशातून येणाऱ्या प्रवाशांना आरटीपीसीआर चाचणी बंधनकारक आहे. देशातील सर्व विमानतळांवर आंतरराष्ट्रीय प्रवाशांची कोरोना चाचणी केली जात आहे. 24 डिसेंबरपासून आतापर्यंत कोरोनाच्या ओमायक्रॉनचे भारतात 11 सब व्हेरियंट आढळले आहेत. दरम्यान, एकूण 124 रुग्ण कोरोनाबाधित आढळले आहेत. सर्वांना विलगीकरणात ठेवण्यात आले आहे.

### जगभरात 665 दशलक्ष लोकांना कोरोनाचा संसर्ग

**» चायनीज सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शनचे (CDC) माजी मुख्य शास्त्रज्ञ झेंग गुआंग यांनी माहिती दिला आहे की, चीनमध्ये अपेक्षेपेक्षाही वेगाने कोरोना विषाणूचा प्रसार झाला आहे. चीनी CDC च्या अंतर्गत कागदपत्रांनुसार, गेल्या वर्षी 1 डिसेंबर ते 20 डिसेंबर दरम्यान, 248 दशलक्ष लोकांना कोरोनाची लागण झाली होती. एशिया टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, आतापर्यंत जागतिक स्तरावर कोविड संसर्गाची एकूण संख्या 665 दशलक्षांवर पोहोचली आहे, तर 6.69 दशलक्ष लोकांचा या कोरोना संसर्गामुळे मृत्यू झाला आहे.**

### भारतातील कोरोनाची स्थिती काय?

**» भारतात ओमायक्रॉनच्या एक्सबीबी.1.5 व्हेरियंटचे (XBB 1.5 VARIANT) पाच आणि बी.एफ.7 व्हेरियंटचे (B.F.7 VARIANT) पाच रुग्ण आढळले आहेतकोरोना विषाणूच्या ओमायक्रॉनच्या सब व्हेरियंटमुळे अमेरिका आणि चीनमध्ये रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. भारतात कोरोनाचे नवीन रुग्ण आढळले असले, तरी येथील परिस्थिती दिलासादायक आहे. देशातील संसर्ग दिवसेंदिवस कमी होत आहे. देशात गुरुवारी 188 नवे रुग्ण आढळले होते आणि 2,554 सक्रिय रुग्णांची नोंद झाली होती.**

# गुलाम नबी आझादांना काँग्रेसचा दणका

## » शेकडो समर्थक कार्यकर्ते काँग्रेसमध्ये 17 नेते स्वगृही परतले

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**




**राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा जम्मू-काश्मीरला पोहोचायच्या आधीच काँग्रेसने गुलाम नबी आझाद यांच्या पक्षावर मोठा सर्जिकल स्ट्राईक केला आहे. माजी उपमुख्यमंत्री ताराचंद आणि माजी प्रदेश अध्यक्ष पीरजादा मोहम्मद सईद यांच्यासह १७ नेते आणि त्यांचे शेकडो समर्थक कार्यकर्ते काँग्रेसमध्ये परतले आहेत. १७ मोठ्या नेत्यांनी आज काँग्रेसच्या मुख्यालयात येऊन पक्षात प्रवेश केला. ताराचंद, माजी मंत्री पीरजादा मोहम्मद सईद, माजी आमदार बलवान सिंह, नरेश शर्मा, विनोद शर्मा, एमके भारद्वाज यांच्यासह १७ जण काँग्रेसमध्ये दाखल झाले आहेत.**

काहीच महिन्यांपूर्वी गुलाम नबी आझाद यांनी काँग्रेसला रामराम ठोकून डेमोक्रेटिक आझाद पक्षाची स्थापना केली होती. यावेळी त्यांच्यासोबत काँग्रेसमधील अनेक नेतेही गेले होते. मात्र, त्यांच्यासोबत जाणं म्हणजे आमची खूप मोठी चूक असल्याचं म्हणत अनेक नेते पुन्हा स्वगृही परतले आहेत.

याच महिन्यांत राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा जम्मू-काश्मीर येथे जाणार आहे. काँग्रेसने रणनीती आखत फारूख अब्दुल्ला, महबूबा मुफ्ती, कम्युनिस्ट नेता युसूफ तारिगामी आणि आवामी नॅशनल लीगचे मुज्जफर शाह यांना भारत जोडो यात्रेत सहभागी करून घेत गुलाम नबी आझाद यांना एकटं पाडलं आहे.

काश्मीर खोऱ्यात आपलं वर्चस्व टीकवण्याकरता गुलाम नबी आझाद यांनाही घरवापसी केल्याशिवाय पर्याय नाही, असा दावा राजकीय तज्ज्ञांकडून करण्यात येतोय.

धर्मनिरपेक्ष ताकदींना कमजोर केले जात असल्याचा आरोप गुलाम नबी आझादांवर केला जातोय. तसंच, भाजपालाही त्यांचा छुपा पाठिंबा असल्याचा दावा ताराचंद यांनी केला आहे.

त्यामुळे आझाद यांच्यासोबत गेलेले अनेकजण स्वगृही परतले आहेत. तसंच, गुलाम नबींनाही पुन्हा काँग्रेसमध्ये आणण्याची रणनीती सुरू असल्याची चर्चा पक्षामध्ये आहे.

# समलैंगिक विवाहाला सरकारचा विरोध का?

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

संविधानाने प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिलाय. मात्र सध्या देशात एका प्रकरणाने चांगलाच गदारोळ माजलाय. ते प्रकरण म्हणजे समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यावरुन.

समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता देण्याची मागणी एका याचिकेद्वारे केली होती. यावर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी होणार आहे. त्यामुळे या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले.

समलैंगिक विवाह म्हणजे दोन समान लिंगाच्या व्यक्तींनी एकमेकांसोबत केलेला विवाह. उदाहरण, दोन पुरुषांमधील विवाह किंवा दोन स्त्रियांमधील विवाह. जरी असा विवाह करणे कायदेशीर गुन्हा नाही तरीसुद्धा अशा विवाहाला काही देशांनी कायदेशीर मान्यता दिलेली नाही.

संसदच्या मते देशात विवाह कायदा हा केवळ एक पुरुष आणि एक महिलेच्या विवाहालाच स्वीकार करण्यास तयार आहे. जर समलैंगिक विवाहाला मान्यता दिली तर मुळ विवाह कायद्यावर वाद निर्माण होऊ शकतो.

सरकारच्या मते देशात विवाह एक पवित्र परंपरा आहे. ज्यामध्ये पुरुष आणि एका महिलेमध्ये दृढ संबंध निर्माण होतात आणि ही परंपरा अनेक काळापासून सुरू आहे जी सामाजिक मुल्यांवर आधारीत आहे.

### समलैंगिक विवाहाला सरकारचा विरोध का ?

**» सरकारच्या मते समलैंगिक असणाऱ्या जोडप्यांचे लग्न आणि लैगिंक संबंध भारतीय कुटूंब प्रणालीत येत नाही. भारतीय कुटूंब प्रणाली एक पुरुष नवरा तर महिला ही पत्नी असते तर या दोघांपासून संतान होतं.**

## प्राजक्ताची नवी इनिंग.. राज ठाकरेंच्या उपस्थितीत 'प्राजक्तराज' चे लॉन्चिंग

: मराठी इंडस्ट्रीत सध्या चर्चेतलं नाव आहे ते प्राजक्ता माळी. प्राजक्ताचे तिच्या मालिका,सिनेमातील भूमिकांमुळे असंख्य चाहते आहेतच शिवाय सोशल मीडियावरही तिचं मोठं फॅन फॉलोइंग आहे.





'रानबाजार' या वेबसिरीजमुळे तिची जितकी प्रशंसा झाली तितकंच त्यातील बोल्ड भूमिकेमुळे तिला ट्रोलही केलं गेलं. अर्थात सोशल मीडियावरही ती अनेकदा तिच्या राजकीय-सामाजिक भूमिका मांडते तेव्हा तिला ट्रोल केलं जातं. पण असं असलं तरी तिच्यावर भरभरुन प्रेम करणारे लाखो चाहते तिच्या हेटर्सपेक्षा कैक पटींन जास्त असतील.

आता प्राजक्तानं अभिनयासोबतच एका नव्या क्षेत्रात पाऊल ठेवलं आहे. प्राजक्ता माळीनं स्वतःचा ज्वेलरी ब्रॅन्ड लॉन्च केला आहे. ज्याचं उद्घाटनं मनसे प्रमुख श्री. राज ठाकरे यांच्या उपस्थितीत पार पडलं. प्राजक्ताच्या या ब्रॅन्डचं नाव 'प्राजक्तराज' असे आहे. आज ६ जानेवारी,२०२३ रोजी प्राजक्तानं मुंबईत एका सोहळ्यात या ब्रॅन्डचं उद्घाटनं केलं.

या ब्रॅन्डच्या माध्यमातून आता प्राजक्ता वेगवेगळ्या पारंपरिक दागिन्यांचा साज घेऊन लोकांच्या भेटीस येत आहे. गेल्या काही दिवसांपासून प्राजक्ता आपल्या या ब्रॅन्डच्या लॉन्चिंग सोहळ्याचं प्रमोशन करताना दिसली खरं, पण तिनं उद्योगविश्वातील आपल्या या नव्या भरारीबद्दल काहीच सांगितलं नव्हतं.

## अमृता फडणवीसांच्या नवीन गाण्याला काही तासांतच लाखो व्ह्यूज

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. सामाजिक विषयांवरचे मत त्या परखडपणे मांडताना दिसतात. त्या एक उत्तम गायिकाही आहेत. दिलखुलास अंदाजाने गाण्यांतून प्रेक्षकांचं मनोरंजन



करणाऱ्या अमृता यांचं मूड बना लिया हे नवीन गाणं प्रदर्शित झालं आहे.

अमृता फडणवीसांच्या इतर गाण्यांप्रमाणे हे गाणंही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. टी सीरिजच्या युट्यूबवर हे गाणं आज प्रदर्शित करण्यात आलं आहे. अवघ्या काही तासांतच या गाण्याला लाखो व्ह्यूज मिळाले आहेत. या गाण्यात अमृता यांचा हटके अंदाज पाहायला मिळत आहे. अमृता यांनी हे गाणं गाण्याबरोबरच डान्सही केला आहे.'मूड बना लिया' या गाण्यातील अमृता यांच्या लूकची व हटके अंदाजाची चर्चा रंगल्याचं पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वीच अमृता यांनी त्यांच्या या गाण्याची घोषणा सोशल मीडियावर केली होती. त्यानंतर या गाण्याचा टीझरही प्रदर्शित करण्यात आला होता. टीझरमध्ये अमृता यांच्या डान्सची झलक चाहत्यांना पाहायला मिळाली होती. तेव्हापासूनच चाहत्यांमध्ये अमृता यांच्या नव्या गाण्याबाबत उत्सुकता वाढली होती.

अमृता यांनी याआधीही अनेक गाण्यांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. पेशाने बँकर असलेल्या अमृता यांना गाण्याची विशेष आवड आहे. 'वो तेरे प्यार का गम', 'शिव तांडव स्तोत्र', 'तेरी मेरी फिर से', 'बेटिया' या त्यांच्या गाण्याला लोकप्रियता मिळाली होती.

## आँखो में तेरी अजब सी अजब सी अदाये है !



परिकथेतील राजकुमारी प्रमाणे ती लोभसवाणी असली तरी तिच्या कारकिर्दीसोबतच वैयक्तिक जीवनाचा आलेख तेवढा सरळसोट नाही. तिला अनेक भावनिक- मानसिक संघर्षांतून जावे लागले आहे. वेगवेगळ्या कारणांवरून तिच्याबद्दल होणाऱ्या चर्चा तर तिच्या पाचवीला पुजलेल्या आहेत. सुरवातीच्या काळामध्ये सिद्धार्थ माल्यासोबत असलेली तिची मैत्री, रणबीर कपूरच्या प्रेमात तिने मानेवर गोंदवलेला 'आर के' चा टॅटू, 'पद्मावत' चित्रपटादरम्यान तिला मिळालेल्या धमक्या, क्लेव्हज कॉंट्रोव्हर्सी, तिने जे. एन. यु. ला दिलेली भेट, रणवीर सिंग सोबतच तिचं प्रेम प्रकरण व नंतर झालेला विवाह... आणि आता आगामी 'पठाण' चित्रपटामध्ये तिने परिधान केलेली भगव्या रंगाची बिकिनी !... पण तरीही आज तरी दीपिका पादुकोण भारतीय सिनेसृष्टीतील ध्रुवपदावर विराजमान आहे. दीपिका आज तिच्या वयाची ३७ वर्षे पूर्ण करत आहे. गेल्या सोळा वर्षांत तिच्या नावावर फक्त तीस चित्रपट आहेत. चित्रपटांसाठी सर्वाधिक मानधन घेणारी भारतीय सिनेसृष्टीमधील आघाडीची अभिनेत्री आहे.

दीपिकाचे वडील प्रकाश पादुकोण हे प्रसिद्ध बॅडमिंटन खेळाडू होते हे सर्वश्रुत

## अमृता खानविलकरचा स्टायलिश लूक चर्चेत

मराठमोळी अभिनेत्री अमृता खानविलकर वारंवार तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते.नुकत्याच मागील काही महिन्यांपूर्वी अमृताचा बहुचर्चित 'चंद्रमुखी' चित्रपट प्रदर्शित झाला होता, या चित्रपटातील तिच्या नृत्याने आणि अभिनयाने साऱ्यांचेच लक्ष वेधून घेतले. या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. तसेच या चित्रपटातील चंद्रा आणि दौलतच्या प्रेमकथेला चाहत्यांती पसंती देखील मिळाली. चित्रपटांबरोबरच अमृता सोशल मीडियावरही सक्रीय असते. सोशल मीडियावर नवनवीन फोटो आणि व्हिडिओ शेअर करत असते.



## 'डेट भेट' या दिवशी येणार प्रेक्षकांच्या भेटीस

अमेय विनोद खोपकर एंटरटेनमेंट आणि झाबवा एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड प्रस्तुत 'डेट भेट' या आगामी चित्रपटाच्या पोस्टर चे अनावरण नुकतेच सोशल मीडियावर करण्यात आले. सोनाली कुलकर्णी , हेमंत ढोमे आणि संतोष जुवेकर यांची प्रमुख भूमिका असलेला 'डेट भेट' 24 फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होत आहे.

'डेट भेट' चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन लोकेश विजय गुप्ते यांचे आहे . पटकथा व संवाद लेखन अश्विनी शेंडे यांनी केले आहे. प्रदीप खानविलकर हे सिनेमॅटोग्राफर आहेत. 'डेट भेट' ची निर्मिती शिवांशु पांडे ,हितेश रुपारेलिया आणि स्वाती खोपकर यांनी केली आहे.

नुकतंच सोनालीनं या चित्रपटाचं मोशन पोस्टर शेअर केलं आहे.

निनाद नंदकुमार बत्तीन,तबरेझ पटेल ,प्रशांत जम्मूवाला,हनी शर्मा यांनी सह निर्मिती केली आहे तसेच असोसिएट निर्माते अजय सोनी आणि प्रशांत शेळके हे आहेत. सिनेमाचे संगीत 'व्हिडिओ पॅलेस' या म्युझिक लेबल द्वारे प्रदर्शित होत आहे तर चित्रपटाचे डिस्ट्रिब्युशन फिल्मअस्त्र स्टुडिओज करत आहेत.




सोनाली कुलकर्णी ही 'डेट भेट' या चित्रपटाबरोबरच 'व्हिक्टोरिया' या आगामी चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. हा सिनेमा 16 डिसेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाचं शूटिंग स्कॉटलंडमध्ये झालं आहे. पुष्कर जोगचा सोनाली कुलकर्णीसोबतचा हा तिसरा सिनेमा आहे.

# ‘खेलो इंडिया’साठी प्रतीक्षा लांडगेची निवड!



## आमदार महेश लांडगेंकडून कौतूक : पुणे जिल्ह्यातून चौघींचा समावेश
## जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा यांनी केली निवड

। पिंपरीः । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मध्यप्रदेश येथे 31 जानेवारी ते 11 फेब्रुवारी 2023 दरम्यान होणाऱ्या पाचव्या खेलो इंडिया गेम्स स्पर्धेसाठी पुणे विभागातून प्रतीक्षा लांडगे हिची निवड करण्यात आली आहे. भोसरीचे आमदार तथा भाजपा शहराध्यक्ष महेश लांडगे यांनी तिचे कौतुक केले आहे. पिंपरी-चिंचवड सह पुणे जिल्ह्यातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तसेच तिच्या पुढील वाटचालीसाठी सदिच्छा देण्यात आल्या आहेत. जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा यांच्या वतीने निवडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कोल्हापूर, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, लातूर, मुंबई, महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन, विदर्भ कबड्डी असोसिएशन या विभागातून खेळाडू सहभागी झालेले होते.सहभागी खेळाडूंमधून महाराष्ट्र संघाची निवड राज्य क्रीडा व युवक सेवा (पुणे) चे सहसंचालक चंद्रांक कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली अर्जुन पुरस्कारप्राप्त शांताराम जाधव, तालुका क्रीडा अधिकारी गीता साखरे, संघटना प्रतिनिधी

### मुलांचा सघ असा...

» यामध्ये मुलांच्या संघासाठी महाराष्ट्र असोसिएशनच्या दादासो पुजारी, जयेश महाजन, पृथ्वीराज चव्हाण, अजित चौहान, रजत सिंग, साहिल पाटील, अनुज गावडे, क्षितीज ठोंबरे, सौरभ धनगर यांच्यासह लातूर येथील अभिराज पवार, पुणे येथील वैभव राबाडे, संग्राम जाधव कोल्हापूर यांची निवड करण्यात झाली आहे.



### पुणे जिल्ह्यातून चार मुलींची निवड...

» राज्यभरातील कबड्डीपटूची निवड चाचणी सातारा येथील क्रीडा संकुलात नुकतीच पार पडली. यामधून मुलांचा आणि मुलींचा संघ जाहीर करण्यात आला.याध्ये पुणे जिल्ह्यातून प्रतीक्षा लांडगे, भूमिका गोरे, मनीषा राठोड, स्नेहा पावरा, यशिका पुजारी मुंबई, काजल मोंढे नागपूर, गायत्री आवचार औरंगाबाद, निकीता लंगोटे महाराष्ट्र असोसिएशन, ऋतुजा आंबी महाराष्ट्र असो. समृद्धी मोहिते मुंबई, हरजित संधू मुंबई, आरती ससाणे महाराष्ट्र असोसिएशन आदींची मुलींच्या कबड्डी संघात निवड करण्यात आली आहे.

# आक्रमक खेळून, दमदार फरफॉर्मन्स करुनही संधी मिळेना

## भारताच्या 23 वर्षीय सेहवागचं करिअर संपलं?

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय संघ सध्या श्रीलंकेविरुद्ध मर्यादित षटकांची क्रिकेट मालिका खेळत आहे. टीम इंडियाने मालिकेतील पहिला टी-२० सामना २ धावांनी जिंकला, पुण्यात खेळले गेलेला दुसरा टी-२० भारताने १६ धावांनी गमावला. आता तिसरा टी-२० गुवाहाटीत होतोय, ज्यात भारताला काहीही करुन विजय मिळवायचाय. गत सामन्यात पहिल्या फळीतील फलंदाजांच्या अपयशामुळे भारताला पराभवाचा धक्का सहन करावा लागला. पण भारताकडे असा एक विस्फोटक फलंदाज आहे, ज्याने आपला दमदार परफॉर्मन्स दाखवूनही भारतीय संघात त्याला स्थान मिळत नाहीये.



कव्हर ड्राइव्ह, स्ट्रेट ड्राइव्ह, बॅकफूट, फ्रंटफूट, फ्लिक, ग्लान्स असा सर्व फटक्यांचा मुक्तहस्ते वापर करून पृथ्वी शॉ धावा वसूल करण्यात माहिर आहे. पॉवरप्लेच्या ओव्हरमध्ये प्रतिस्पर्धी संघाच्या बोलर्सवर आक्रमण चढवून, अक्षरशः हल्ला करुन विरोधी संघाला सळो की पळो करुन सोडणाऱ्या पृथ्वीला भारतीय संघात का स्थान दिलं जात नाहीये? हा प्रश्न तमाम भारतीय क्रिकेट फॅन्स विचारत आहेत. प्रतिस्पर्धी संघावर पूर्णपणे वरचढ होऊन सुरुवातीच्याच काही ओव्हर्समध्ये मॅच पलटवायची क्षमता असलेला विस्फोटक सलामीवीर पृथ्वीला निवड समितीने एक वर्षाहून अधिक काळ टीम इंडियामध्ये स्थान दिलेलं नाही. पृथ्वी शेवटच्या वेळी २०२१ मध्ये श्रीलंका दौऱ्यावर वनडे आणि टी २० मालिकेत खेळताना दिसला होता. २२ वर्षीय पृथ्वी शॉ हा सचिन तेंडुलकर आणि वीरेंद्र सेहवाग यांच्यासारखेच आक्रमक फटके खेळण्यासाठी ओळखला जातो. छोटा विरु पाजी म्हणूनही त्याची ओळख आहे.आयपीएलमध्ये जोरदार कामगिरी करुनही पृथ्वीच्या नावाचा निवड समिती विचार करत नाहीये. आयपीएलनंतर जवळपास ५ देशांविरोधात भारतीय संघ खेळला. आता श्रीलंकेविरोधात खेळताना नव्या खेळाडूंना संधीही दिली गेली. पण पृथ्वीच्या नावाचा साधा विचारही झाला नाही. याचाच अर्थ पृथ्वीकडे कटाक्षही न टाकता निवड समिती त्याच्याऐवजी दुसऱ्या खेळाडूंना संधी देत असल्याने पृथ्वीचं इंटरनॅशनल करिअर संपलं का? असा प्रश्न क्रिकेट रसिक विचारत आहेत.

भारताने पृथ्वी शॉच्या नेतृत्वाखाली २०१९ मध्ये १९ वर्षाखालील विश्वचषक जिंकला आहे. पृथ्वी शॉने भारतासाठी ५ कसोटी सामन्यात ३३९ धावा केल्या आहेत.

# पांड्यासाठी हुकुमाचा एक्का ठरणार हा खेळाडू

मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था

भारत आणि श्रीलंका यांच्यातील तीन सामन्यांची टी-२० मालिका १-१ अशा बरोबरवर पोहोचली आहे. या मालिकेतील शेवटचा सामना दोन्ही संघांसाठी खूप महत्त्वाचा असणार आहे. हा सामना ७ जानेवारी रोजी सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर होणार आहे. या सामन्यासाठी कर्णधार हार्दिक पांड्या प्लेइंग ११ मध्ये अनेक मोठे बदल करू शकतो. तो प्लेइंग ११ मध्ये अशा खेळाडूचा समावेश करू शकतो जो आतापर्यंत फक्त बेंचवर दिसला आहे.

हार्दिक पांड्याने कर्णधार म्हणून अद्याप एकही मालिका गमावलेली नाही, त्याला कोणत्याही प्रकारे श्रीलंकेविरुद्धचा शेवटचा टी-२० सामना जिंकायचा आहे. या मालिकेत स्टार अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर देखील संघाचा भाग आहे. परंतु, त्याला अद्याप एकही सामना खेळण्याची संधी मिळालेली नाही. अशा परिस्थितीत वॉशिंग्टन सुंदर शेवटच्या सामन्यात



संघाचा भाग असू शकतो.

गेल्या काही काळापासून टीम इंडियामध्ये स्थान मिळवण्यात तो सातत्याने यशस्वी होत आहे. तो गोलंदाजी तसेच फलंदाजीतही योगदान देतो. त्यामुळे तो कर्णधार पांड्यासाठी मोठा सामना विजेता ठरु शकतो.

वॉशिंग्टन सुंदर टीम इंडियासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळला आहे. त्याने टीम इंडियासाठी ४ कसोटी सामन्यात २६५ धावा आणि ६ विकेट्स घेतल्या आहेत. त्याचबरोबर १२ एकदिवसीय आणि ३२ टी-२० सामनेही खेळले गेले आहेत. या एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने २१२ धावा आणि १४ विकेट्स घेतल्या आहेत. त्याचवेळी, टी-२० सामन्यांमध्ये सुंदरने फलंदाजी करताना ४७ धावा आणि गोलंदाजीत २६ विकेट्स घेतल्या आहेत.